**हे लक्षात घ्या –**

तुम्ही या पात्रता यादीत बसत असालात योग्य विधी सेवा संस्थेने हे ठरविले पाहिजे की, संबंधित प्रकरण हे खटला चालवण्यास किंवा बचाव करण्यास योग्य आहे किंवा नाही. कायदेशीर पाऊल उचलले जावे यासाठीची योग्यता तुमच्या अर्जात दिसत नसल्यास कायदेशीर सेवा दिल्या जाणार नाहीत.

### मोफत कायदेशीर मदतीसाठी कोणाशी संपर्क साधावा?

राष्ट्रीय, राज्य, जिल्हा किंवा तालुका पातळीवरील कुठल्याही विधी सेवा संस्थेशी संपर्क साधला जाऊ शकतो. तुमच्या खटल्यासाठी गरज वाटल्यास तुमची विनंती योग्य त्या विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठवणे ही त्या विधी सेवा संस्थेची जबाबदारी आहे. अशी विनंती या ठिकाणी केली जाऊ शकते–

- तालुका विधी सेवा समितीचा अध्यक्ष म्हणून नेमणूक केले गेलेले वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश
- सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण
- सचिव, उच्च न्यायालय विधी सेवा समिती
- सचिव, सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती
- सदस्य सचिव, राज्य विधी सेवा प्राधिकरण
- अटक झालेल्या व्यक्तीला ज्यांच्यापुढे सादर केले जाते ते न्यायदंडाधिकारी किंवा
- व्यक्ती स्थानबद्ध असेल, तर पोलीस आणि तुरुंग अधिकारी हे योग्य त्या विधी सेवा प्राधिकरणाशी सहजपणे जोडून घेतील.

तुम्ही कैदेत/कोठडीत असाल तरीही तुमच्यावर खटला चालण्याआधी किंवा चालताना तुम्हाला कायदेशीर प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. ते मिळत असल्याचे पाहणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. तुम्हाला पहिल्यांदा न्यायालयापुढे सादर केले जाते तेव्हा तुमच्याकडे वकील आहे का, हे न्यायालयाने तुम्हाला विचारले पाहिजे आणि तुमच्याकडे वकील नसल्यास न्यायालयाने राज्य यंत्रणेच्या खर्चाने वकील नेमला पाहिजे.

### कायदेशीर मदत कशी मागावी?

- लिखित अर्ज द्या
- तुम्ही वाचू किंवा लिहू शकत नसाल, तर विधी सेवा प्राधिकरण तुमचे म्हणणे नोंदवून घेईल. त्या नोंदीखाली तुमच्या अंगठ्याचा ठसा असेल. याला अधिकृत अर्जाचा दर्जा असतो.
- तुम्ही उत्पन्नाच्या आधारे अर्ज करत असाल, तर उत्पन्नाचं शपथपत्र देणे गरजेचे आहे.

### कायदेशीर मदत मिळालेल्या व्यक्तीची कर्तव्ये काय आहेत?

- विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिवाने सांगितलेल्या सर्व सूचना आणि नियमांचे पालन करणे.
- प्राधिकरणाचे कार्यालय, न्यायालयाचे कार्यालय किंवा कायदेशीर मदत देणाऱ्या वकिलाच्या कार्यालयात गरज पडलेल्या वेळी जाणे.
- कायदेशीर मदत देणाऱ्या वकिलाला सत्य आणि पूर्ण माहिती देणे.
- कायदेशीर मदत देणाऱ्या वकिलाला कुठलीच फी न देणे

### सीपीआरआयविषयी.....

कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स इनिशिएटिव्ह ही एक आंतरराष्ट्रीय, स्वतंत्र, स्वयंसेवी, ना-नफा संस्था आहे. **सीपीआरआयचे** मुख्यालय भारतामध्ये आहे. प्रजासत्ताक देशांमध्ये मानवी हक्कांची जोपासना आणि जाणीव जागृती करणे हे या संस्थेचे काम आहे. मानवी हक्कांचे सतत आदर्श पद्धतीने पालन व्हावे यासाठी ही संस्था सतत प्रयत्न करते.

### आमचे उपक्रम


- ॲक्सेस टू जस्टिस (पोलीस दलाबाबतच्या सुधारणा)
- ॲक्सेस टू जस्टिस (तुरुंग यंत्रणेबाबतच्या सुधारणा)
- ॲक्सेस टू इन्फर्मेशन
- इंटरनॅशनल ॲडव्होकसी ॲन्ड प्रोग्रामिंग

**कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह**

सीपीआरआय CHRI मुख्यालय
तिसरा मजला, सिद्धार्थ चेंबर्स,
५५ ए, कालू सराय,
नवी दिल्ली– १०० ०१७ भारत,
दूरध्वनी : +९१-११-४३१८०२००
फॅक्स : +९१-११-४३१८-०२१७
ई-मेल : info@humanrightsinitiative.org
Website http://www.humanrightsinitiative.org

## कायदेविषयक मदत

# पोलीस आणि तुम्ही
## तुमचे अधिकार जाणा



CHRI
Commonwealth Human Rights Initiative

## कायदेविषयक मदत व तुम्ही

आपल्या देशातील हजारो लोक एखाद्या गुन्ह्यात आरोपी ठरल्यानंतर किंवा एखादे प्रकरण कोर्टात न्यायचे असल्यास स्वतःसाठी वकील नेमू शकत नाहीत. याचा अर्थ असा होतो, की त्यांना न्यायव्यवस्थेत वा न्याययंत्रणेत त्यांच्या हक्काचे स्थानच मिळत नाही.

नागरिकांना न्यायव्यवस्थेपर्यंत सहज पोचता यावे यासोबतच कायदेशीर मदत हवी तेव्हा मिळावी, हे राज्ययंत्रणेने पाहणे गरजेचे आहे. किंबहुना राज्यव्यवस्थेचे ते कर्तव्यच आहे. भारतीय संविधानाचे कलम ३९ (अ) सांगते की, आर्थिक किंवा इतर कारणांमुळे दुबळेपण आलेल्या नागरिकांना मोफत कायदेशीर मदत मिळण्याचा हक्क आहे. मोफत कायदेशीर मदत देऊ करणं हे राज्ययंत्रणेचं कर्तव्य आहे. या पत्रकात तुम्हाला मोफत कायदेशीर मदत मिळवण्याचा हक्क आणि ती कशी मिळवली पाहिजे, याबाबत माहिती मिळेल.

## कायदेशीर मदतीचा अधिकार

- भारतीय संविधान प्रत्येक अटक झालेल्या व्यक्तीला त्याला/तिला योग्य वाटणाऱ्या वकिलाचा सल्ला घेण्याचा आणि त्याच्या माध्यमातून खटला लढवण्याचा अधिकार देते. कलम २२ (१) भारतीय संविधान कायदेशीर मदतीचा हा अधिकार खटला चालू असताना नाही तर अगदी अटक झाल्यापासूनच लागू होतो आणि खटला संपेपर्यंत नाही तर जोवर निकालाला आव्हान देण्यासाठी तुम्ही सगळे कायदेशीर मार्ग वापरून संपवत नाही तोवर हा अधिकार तुम्हाला असतो.
- कलम ३९(अ) कलम २१ सोबत एकत्र वाचले असता सांगते, की ज्या कोणाला कायदेशीर सल्ला परवडत नाही त्या सगळ्यांसाठी कायदेशीर मदत ही अधिकाराची बाब आहे.

## विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७

- १९८७ मध्ये संसदेने विधी सेवा प्राधिकरण अधिनियम संमत केला. या माध्यमातून विविध पातळ्यांवर कायदेशीर सेवा निर्माण केल्या जातात. त्यांचा हेतू पुढीलप्रमाणे- केवळ आर्थिक किंवा इतर दुबळेपणामुळे कुठल्याही नागरिकाला न्याय मिळवण्याच्या संधींपासून वंचित राहावे लागू नये यासाठी मोफत आणि सक्षम कायदेशीर सेवा पुरवणे.
- हा कायदा मोफत कायदेशीर सेवेचा अधिकार प्रत्यक्षात आणतो. अनेक लोकांसाठी एखादा खटला लढण्यासाठी किंवा दाखल करण्यासाठी वकील नेमणे अवघड असते. गरिबी, जात,संप्रदाय, किंवा लिंग यांबाबतच्या विषमतांमुळे हे होऊ शकते. मात्र हा कायदा यासाठीची मदत देऊ करत खटला दाखल करण्यास किंवा लढण्यास प्रोत्साहन देते.

**या अधिनियमाच्या माध्यमातून विविध पातळ्यांवर कायदेशीर संस्था स्थापन केल्या जातात. खालील संस्था कायदेशीर सेवांसाठीच्या बाबी तुम्हाला सहजपणे मिळवून देतात.**

- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण केंद्रीय पातळीवर काम करते. सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती स्थापण्यास हे राष्ट्रीय सेवा प्राधिकरण आहे.
- राज्य विधी सेवा प्राधिकरण राज्य पातळीवर कार्य करीत असते. हे राज्य प्राधिकरण उच्च न्यायालय विधी सेवा समिती स्थापन करण्यासाठी असते.सोबतच हे राज्य प्राधिकरण तालुका पातळीवर तालुका विधी सेवा समित्यासुद्धा स्थापन करते.
- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जिल्हा पातळीवर असते.

## विधी सेवा प्राधिकरण खालील सेवा देऊ करते

- न्यायालय आणि इतर प्रक्रियांचे शुल्क अर्थात फी देणे.
- कुठल्याही कायदेशीर कामकाजासाठी तयारी, फायलिंग आणि नोंदी करताना लागलेल्या कुठल्याही शुल्काची/ खर्चाची रक्कम किंवा परतफेड देणे.
- वकील किंवा कायदेशीर सल्ला देणाऱ्याची फी किंवा मानधन देणे.
- कायदेशीर कामकाजात लागणारे न्यायालयाचे विविध हुकूम, निकाल, आदेश आणि इतर विविध कागदपत्रे यासाठीची रक्कम किंवा परतफेड देणे.
- छपाई आणि भाषांतरासह सर्व प्रकारच्या कागदोपत्री प्रक्रियेसाठी लागणारी रक्कम किंवा परतफेड देणे.

## मोफत कायदेशीर मदतीसाठी कोण पात्र आहे ?

- या अधिनियमात मोफत कायदेशीर मदतीसाठी कोण पात्र आहे ते दिलेले आहे. या अधिनियमाचे कलम १२ सांगते, की प्रत्येक व्यक्तीला खटला दाखल करण्यास किंवा लढण्यास मदत दिली जाईल जर ती –
- अनुसूचित जाती किंवा जमातीची सदस्य असेल
- गरीब – सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल करण्याच्या संबंधाने, ज्या व्यक्तींचं उत्पन्न वार्षिक ५०,००० च्या पुढं जात नाही अशा लोकांचा यात समावेश होतो. इतर न्यायालयांमध्ये खटले दाखल करण्यासाठी त्या त्या राज्यांनी ठरवून दिलेल्या उत्पन्नाच्या मर्यादा विचारात घेतल्या जातात. त्या प्रत्येक राज्यानुसार बदलतात.
- मानवी तस्करीतील पीडित व्यक्ती किंवा भिकारी
- शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्ती
- महिला किंवा मूल
- मोठी सामूहिक दुर्घटना, वांशिक हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर, दुष्काळ किंवा भूकंप यातील पीडित असलेल्या व्यक्ती
- कारखान्यातील कामगार
- संरक्षणगृह, बालगृह किंवा मानसोपचार रुग्णालयाच्या कोठडीत असलेली व्यक्ती. याचा अर्थ होतो, कोठडीत असलेली कोणतीही व्यक्ती. भलेही त्याची न्यायिक चौकशी सुरू असेल किंवा गुन्हा सिद्ध झाला असेल, त्याला मोफत कायदेशीर मदत मिळण्याचा अधिकार आहे.